# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

# सरळसेवा भरती २०१९ (वर्ग - क व वर्ग-ड)

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन विभागाच्या आस्थापनेवरील **चालक यंत्र चालक, अग्निशमन विमोचक, चालक (अग्निशमन), ऑटो इलेक्ट्रीशीयन व मदतनीस (अग्निशमन)** इत्यादी वर नमुद संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी फक्त पात्र पुरुष उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पद्धतीने अर्ज मागिविण्यात येत आहेत.

रिक्त पदांचा तपशील, शैक्षणिक अर्हता, विहित केलेली वेतनश्रेणी,सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, नियुक्तीच्या अटी व शर्ती व ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याबाबतच्या सुचना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या www.midcindia.org या संकेतस्थळावर व मे.महापरिक्षा यांचे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १५/१०/२०१९ सायंकाळी ६.०० वाजलेपासुन ते दिनांक ०४/११/२०१९ रात्री ११.५९ वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

**१) संवर्गाचे नाव : चालक यंत्र चालक (वर्ग-क)**

वेतन श्रेणी : एस-७ रु.२१,७०० - ६९,१००.

**वयोमर्यादा :**

उमेदवाराचे वय दिनांक ०४/११/२०१९ रोजी

- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असु नये.
- मागसवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त असु नये.

**अर्हता :**

- माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण.
- वाहन चालक या पदावर ३ वर्षाचा काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक.
- जड वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक.
- मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिता,बोलता व वाचता)

**पाठ्यक्रम :-**

- उमेदवाराची नियूक्ती झाल्यानंतर त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक/चालक यंत्र चालकाचा कोर्स पुर्ण केला नसेल तर त्यास सदर प्रशिक्षण केंद्राचा ६ महिन्याचा अग्निशामक पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक राहील.
  (जे उमेदवार सदरचा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण करत नाही तोपर्यंत त्यांचा सेवेचा कालावधी हा परिक्षाविक्षाधीन कालावधी समजण्यात येईल).

**शारीरीक पात्रता :-**

उंची :- किमान १६५ से.मी.

वजन :- किमान ५० किलोग्रॅम

छाती :- ८१ सेमी (साधारण) ८६ सेमी (फुगवून)

दृष्टी :- चांगली.

| प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा .प्र. | इ.मा. व. | एस.ई. बी.सी | ई.डब्लु. एस | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ० | १ | ० | १ | १ | ० | १ | ३ | १ | १ | ०९ | १ | १० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| १) सर्वसाधारण | ० | १ | ० | १ | १ | ० | १ | ३ | १ | १ | ०९ | १ | १० |
| २) माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३) प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४) भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५) खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६) अशंकालीन कर्मचारी १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७) अनाथ १% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

**२) संवर्गाचे नाव :- चालक (अग्निशमन) (वर्ग-क)**

वेतन श्रेणी : एस-६ रु.१९,९०० - ६३,२००.

**वयोमर्यादा :**

उमेदवाराचे वय दिनांक ०४/११/२०१९ रोजी

- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असु नये.
- मागसवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त असु नये.

**अर्हता :**

- माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण.
- वाहन चालक या पदावर ३ वर्षाचा काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक.
- जड वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक.
- मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक. (लिहिता,वाचता व बोलता येणे आवश्यक).

**पाठ्यक्रम :-**

- उमेदवाराची नियूक्ती झाल्यानंतर त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक/चालक यंत्र चालकाचा कोर्स पुर्ण केला नसेल तर त्यास सदर प्रशिक्षण केंद्राचा ६ महिन्याचा अग्निशामक पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक राहील.

(जे उमेदवार सदरचा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण करत नाही तोपर्यंत त्यांचा सेवेचा कालावधी हा परिक्षाविक्षाधीन कालावधी समजण्यात येईल).

**शारीरीक पात्रता :-**

उंची :- किमान १६५ से.मी. छाती :- ८१ सेमी (साधारण) ८६ सेमी (फुगवून)

वजन :- किमान ५० किलोग्रॅम दृष्टी :- चांगली.

अ. वाटेगे

| प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा .प्र. | इ.मा. व. | एस.ई. बी.सी | ई.डब्लु. एस | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ०४ | १ | ०५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| १) सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ०४ | १ | ०५ |
| २) माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३) प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४) भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५) खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६) अशंकालीन कर्मचारी १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७) अनाथ १% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

**३) संवर्गाचे नाव :- अग्निशमन विमोचक (वर्ग-क)**

वेतन श्रेणी : एस-६ रु.१९,९०० - ६३,२००.

**वयोमर्यादा :**

**उमेदवाराचे वय दिनांक ०४/११/२०१९ रोजी**

- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असु नये.
- मागसवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त असु नये.

**अर्हता :-**

- माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण असणे आवश्यक.
- राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,महाराष्ट्र शासन,मुंबई यांचा अग्निशमन पाठ्यक्रम उत्तीण असणे आवश्यक.
- एम.एस.सी.आय.टी परीक्षा अथवा समकक्ष परीक्षा उत्तीण असणे आवश्यक.
- मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिता,वाचता व बोलता येणे आवश्यक).

**शारीरीक पात्रता :-**

उंची :- किमान १६५ से.मी.

वजन :- किमान ५० किलोग्रॅम

छाती :- ८१ सेमी (साधारण) ८६ सेमी (फुगवून)

दृष्टी :- चांगली.

| प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा .प्र. | इ.मा. व. | एस.ई. बी.सी | ई.डब्लु. एस | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | १९ | १० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०२ | ०९ | १८ | १४ | ७५ | ६० | १३५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| १) सर्वसाधारण | १२ | ०५ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०२ | ०७ | ११ | ०९ | ४९ | ३७ | ८६ |
| २) माजी सैनिक १५% | ३ | २ | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | २ | ११ | ०९ | २० |
| ३) प्रकल्पग्रस्त ५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ०४ | ०३ | ०७ |
| ४) भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ |
| ५) खेळाडू ५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ०४ | ०३ | ०७ |
| ६) अशंकालीन कर्मचारी १०% | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | १ | ०७ | ०६ | १३ |
| ७) अनाथ १% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ |

**४) संवर्गाचे नाव :- वीजतंत्री ग्रेड-२ (ऑटोमोबाईल)** (खुला प्रवर्ग १ पद) आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ३ (१) (घ) येथील तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागु होत नाही.

वेतन श्रेणी : एस-८ रु.२५,५०० - ८१,१००.

**वयोमर्यादा :-**

**उमेदवाराचे वय दिनांक ०४/११/२०१९ रोजी**

- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असु नये.
- मागसवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त असु नये.

**अर्हता :-**

- माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण.
- शासनमान्य संस्थेचा ऑटो इलेक्ट्रीशियनचा कोर्स पूर्ण केलेला असावा.

**शारीरीक पात्रता :-**

उंची :- किमान १६५ से.मी. छाती :- ८१ सेमी (साधारण) ८६ सेमी (फुगवून)
वजन :- किमान ५० किलोग्रॅम दृष्टी :- चांगली.

**५) संवर्गाचे नाव :- मदतनीस (अग्निशमन) (वर्ग - ड)**

वेतन श्रेणी : एस-१ रु.१५,००० - ४७,६००.

**वयोमर्यादा :-**

**उमेदवाराचे वय दिनांक ०४/११/२०१९ रोजी**

- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असु नये.
- मागसवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त असु नये.

**अर्हता :-**

- माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशमन पाठ्यक्रम उत्तीर्ण असावा.
- मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक).

**शारीरीक पात्रता :-**

उंची :- किमान १६५ से.मी. छाती :- ८१ सेमी (साधारण) ८६ सेमी (फुगवून)
वजन :- किमान ५० किलोग्रॅम दृष्टी :- चांगली.

| प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा .प्र. | इ.मा. व. | एस.ई. बी.सी | ई.डब्लु. एस | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | **५** | **३** | **१** | **१** | **१** | **१** | **१** | **७** | **५** | **५** | **३०** | **०६** | **३६** |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | | | |
| १) सर्वसाधारण | ३ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ५ | ३ | ३ | २२ | ०४ | २६ |
| २) माजी सैनिक १५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ०४ | ०१ | ०५ |
| ३) प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०० | ०० | ०० |
| ४) भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०० | ०० | ०० |
| ५) खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०० | ०० | ०० |
| ६) अशंकालीन कर्मचारी १०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ०४ | ०१ | ०५ |
| ७) अनाथ १% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०० | ०० |

**टिप : १) वर नमूद पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल/वाढ होऊ शकते.**

**२) वरीलमध्ये 'एस.ई.बी.सी.' म्हणजे 'सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग' होय आणि 'ई.डब्ल्यु.एस' म्हणजे 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक' होय.**

---- ५/-

**समांतर आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

१) **माजी सैनिकांसाठी :-** भूदल,नाविक दल व हवाईदल सेवेमध्ये सहा महिने व त्यापेक्षा अधिक सेवा केली असेल याप्रमाणे संरक्षण सेवेमध्ये केलेली एकूण सेवा,महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्रमांक एमआरव्ही -१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ दिनांक १६/०३/१९९९ मधील तरतुदीनुसार माजी सैनिकांसाठी १५% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे.

२) **प्रकल्पग्रस्तांसाठी :-** प्रकल्पग्रस्तांसाठी ५% समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. तसेच महामंडळातील सेवा व पदांवर नियुक्ती करताना महामंडळासाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनामुळे बाधित झालेल्या उमेदवारांना द्यावयाचे आरक्षण व प्राधान्य यांच्या संदर्भात, वेळोवेळी महामंडळाकडून काढण्यात आलेले आदेश/सुचना यांचे यथोचितरित्या पालन करण्यात येईल. शासनाने प्रकल्पग्रस्तांसाठी ५% समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे.

३) **खेळाडूंसाठी :-** राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय,निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षणा संदर्भात महाराष्ट्र शासन,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो - २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१/०७/२०१६ व शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२ दि. १७/०३/२०१७ मधील विहित केलेल्या अटी व शर्थीनुसार पात्र उमेदवारांमधून भरती करण्यात येईल. खेळाडूंसाठी ५% समांतर आरक्षण ठेवणेत आले आहे.

४) **अंशकालीन कर्मचारी :-** महाराष्ट्र शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रं.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि.२७ ऑक्टोबर,२००९ अन्वये सुशिक्षित रोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना गट-क पदामधील सरळसेवेच्या करावयाच्या नियुक्तीसाठी १० टक्के समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे.

५) **भुकंपग्रस्तांसाठी :-** भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी २% समातंर आरक्षण ठेवणेत आले आहे. शासनाने राज्यातील भुकंपबाधित जिल्ह्यातील भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक भूकंप १००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ,दि.२७/०८/२००९ अन्वये २% आरक्षण निश्चित केले आहे.

६) **शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग (एस.ई.बी.सी) :-** शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग (एस.ई.बी.सी) उमेदवारांकरीता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्रं.बीसीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३० /मावक,दि.०७/१२/२०१८ अन्वये विहीत करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. या प्रवर्गातील लाभाकरीता अलिकडील/नविनतम मुळ नॉन क्रिमीलेयर प्रमंणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

७) **खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ई. डब्ल्यु.एस.) :-** खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ई. डब्ल्यु.एस.) वर्गातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रं.राआधो - ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ,दि.१२ /०२ /२०१९ अन्वये विहीत करण्यात आलेले कागदपत्रे/पुरावा (परिशिष्ट क) आणि स्वयंघोषणापत्र (परिशिष्ट ड) पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी

वारीमु

अर्जदाराच्या/उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८ लाखाच्या आत पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि.१३ ऑक्टोबर,१९६७ रोजी किंवा त्यापुर्वीचे रहिवासी असणे आवश्यक राहील.

सदर प्रवर्गातील उमेदवारांकरीता वय,परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती ह्या इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.

८) विजा-अ,भज (ब),भज (क), या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या प्रवर्गातील उमेदवार उपल्ब्ध न झाल्यास आंतरपरिवर्तनीय आहे.

९) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या-त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते.

१०) महाराष्ट्र राज्यात अधिवास असणाऱ्या उमेदवारांनी अर्ज करावेत. तथापि अन्य राज्यातुन स्थलांतरीत झाले असल्यास महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक राहील.

११) इमाव, विमाप्र, विजा-अ, भज (ब), भज (क), भज-ड या मागास प्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) अंतिम निवडपूर्व कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

सदर प्रमाणपत्रावर निर्गमित केलेला दिनांक,वित्तीय वर्ष नमुद नसल्यास सदर प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच ज्या जातीचे प्रमाणपत्र असेल त्या जातीचा उल्लेख नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्रावर असणे आवश्यक राहील. अन्यथा प्रमाणपत्रावरील नमुद जात प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही आणि तो उमेदवार निवडीसाठी अपात्र ठरेल.

## परीक्षेचे स्वरुप :-

| अ. क्र. | पदाचे नाव | भाग-१ सामान्य ज्ञान | भाग-२ तर्क क्षमता | भाग-३ तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचे स्वरुप | परीक्षेचा कालावधी (मिनीटे) | व्यावसायिक परीक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | | | |
| १. | चालक यंत्र चालक | ५० | ५० | - | १०० | १०० | ऑन लाईन | १२० मि. | उमेदवाराची प्रत्यक्ष वाहन चालविण्याबाबतची १०० गुणांची व्यवसायिक चाचणी परीक्षा प्रादेशिक परिवहन कार्यालय यांचेमार्फत घेण्यात येईल. |
| २. | चालक (अग्निशमन) | ५० | ५० | - | १०० | १०० | ऑन लाईन | १२० मि. | उमेदवाराची प्रत्यक्ष वाहन चालविण्याबाबतची १०० गुणांची व्यवसायिक चाचणी परीक्षा प्रादेशिक परिवहन कार्यालय |

----- ७/-

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | यांचेमार्फत घेण्यात येईल. |
| ३. | अग्निशमन विमोचक | २५ | २५ | ५० | १०० | १०० | ऑन लाईन | १२० मि. | - |
| ४. | ऑटो इलेक्ट्रीशियन | ५० | ५० | - | १०० | १०० | ऑन लाईन | १२० मि. | - |
| ५. | मदतनीस (अग्निशमन) | २५ | २५ | ५० | १०० | १०० | ऑन लाईन | १२० मि. | - |

## भरतीची कार्यपध्दती व निवडीचे निकष :-

उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येणार असून १) चालक यंत्र चालक, २) चालक (अग्निशमन), ३) अग्निशमन विमोचक, ४) ऑटो इलेक्ट्रीशियन, ५) मदतनीस (अग्निशमन) या पदांच्या ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहेत. **परिक्षेची रुपरेषा, तारीख व वेळ इत्यादी माहिती वेळोवेळी महा परीक्षा पोर्टल यांच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर भरतीप्रक्रियेचे निवडीचे निकष गुणानुक्रमे / जात प्रवर्ग निहाय करण्यात येतील.**

## कमाल व किमान वयोमर्यादा:- (अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक ०४/११/२०१९ रोजी)

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी किमान १८ व कमाल ३८ वर्ष.
२) मागास प्रवर्गासाठी किमान १८ व कमाल ४३ वर्षे.
३) महामंडळाच्या ठाणे-बेलापुर औद्योगिक क्षेत्रातील "ठाणे बेलापुर इंडस्ट्रीज असोसिएशन" मार्फत दैनंदिन देखभालीसाठी चालविण्यात येणाऱ्या फायर ॲन्ड इर्मजन्सी रिसपॉन्स स्टेशन, अग्निशमन केंद्रातील चालक यंत्र चालक व अग्निशमन विमोचक जे शैक्षणिक अर्हता पुर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे इतकी शिथिलक्षम राहील.
४) खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील राहील. तथापि कोणत्याही प्रवर्गात उमेदवारांची उच्चत्तम वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.
५) माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.
६) अंशकालीन पदवीधर उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे राहील.
७) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.
८) अनाथ उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.
९) महामंडळाच्या अग्निशमन सेवेतील तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण यांच्या अग्निशमन सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकरीता अनुभवाच्या आधारे वयाची अट शिथील करण्याचे अधिकार म.औ.वि.महामंडळाने राखुन ठेवले आहेत.

**लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ च्या अधिसूचनेनुसार महामंडळाच्या सेवाप्रवेशासाठी लहान कुटूंबाचे नमुना-अ मधील प्रतिज्ञापन उमेदवाराने मुलाखतीपूर्वी / कागदपत्र पडताळणीवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

**मराठी भाषेचे ज्ञान :-**

उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान (लिहिता,बोलता व वाचता) येणे आवश्यक राहील.

**भरती प्रक्रिया शुल्क (नापरतीचे) :-**

१) ऑनलाईन परीक्षेसाठी खुला प्रवर्ग रु. ७००/- मागासवर्गीय प्रवर्ग - रु. ५००/- , अनाथ - रु.५००/-

वरीलप्रमाणे भरती प्रक्रिया शुल्क क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, BHIM UPI अथवा नेटबँकिगच्या सहाय्याने ऑनलाईन पध्दतीने अदा करता येईल. **माजी सैनिकांना अर्जासोबत प्रक्रिया शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

**ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

१) अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जातील.
२) ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे अर्ज www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

**ऑनलाईन अर्ज करण्याचे वेळापत्रकः-**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कलावधी | दि. १५/१०/२०१९ सायंकाळी ६.०० वाजलेपासून | दि. ०४/११/२०१९ रात्री ११.५९ वाजेपर्यंत |
| २ | परीक्षेचा दिनांक व वेळ | परीक्षेची तारीख व वेळ वेळोवेळी म.औ.वि.महामंडळाच्या www.midcindia.org व महा परीक्षा पोर्टल यांच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल. | |

**अर्ज भरण्याची कार्यपध्दती आणि सुचना :-**

१) उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लगेल. उमदेवाराने आपल्या उजव्या बाजुला असलेल्या सूचना या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करुन यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या / तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची (Activation) लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे / तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या / तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या

लिंकवर क्लिक करावे. (Activation लिंक ही २ दिवसांकरीता activate असेल.) उमेदवाराने त्याची / तिची लॉगइनची माहिती गोपनिय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरुन केव्हाही लॉग ऑन होता येईल.

टिप :-USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जाबाबदारी उमेदवाराची असेल.

२) उमेदवाराचे नाव, वडीलांचे नाव, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.

३) छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती- कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ kb ते ५० kb च्या दरम्यान असावे. (टिपः- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे.)

४) पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. सहित माहिती भरावी.

५) त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.

उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्याआधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी.

६) ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी. तसेच उमेदवाराने आधार क्रमांक / आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी. समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल.

७) सर्व पदाकरीता महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी (MS-CIT) परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तथापि, खाली नमुद केलेल्या संगणक/ माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

**अ)** D.O.E.A.C.C/N.E.I.L.I.T. नवी दिल्ली चे प्रमाणपत्रधारक.

**ब)** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय अभ्यासक्रमाच्या इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी साठी माहिती तंत्रज्ञान विषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांना व इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी साठी माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, कॉम्पुटर टेक्निक व मल्टीमिडीया अँड इंटरनेट टेक्नॉलॉजी हे विषय अभ्यासुन उत्तीर्ण.

**क)** केंद्रीय माध्यमिक शालेय शिक्षण मंडळाची इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी ची परिक्षा संगणक/ माहिती तंत्रज्ञान हे विषय घेऊन उत्तीर्ण.

**ड)** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षध मंडळाच्या संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology)/ संगणक अभियांत्रिकी ( Computer engineering)/ माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयाचा राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा पदवी/पदविका व संगणक उपाययोजन (Computer Application), संगणक उपाययोजन पद्धती व पृथक्करण

(ADCSSAA) या पदव्युत्तर प्रगत पदविका (Advance Diploma), सर्व शासनमान्य विद्यापिठातील संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology)/ संगणक अभियांत्रिकी ( Computer engineering)/ माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयाचा राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा पदवी/पदविका व संगणक उपाययोजन (Computer Application), संगणक उपाययोजन पद्धती व पृथक्करण (ADCSSAA) या पदव्युत्तर प्रगत पदविका (Advance Diploma) उत्तीर्ण केलेले उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण.

**इ)** व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळामार्फत चालविण्यात येणारे शासन निर्णय क्रं.मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९,दि.०४.०२.२०१३ अन्वये परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेले संगणक विषयी ८६ अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र पत्रधारक.

८) सर्व पदांना लेखी परिक्षा अनिवार्य असेल. ऑनलाईन लेखी परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी, परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी माहिती महामंडळाच्या www.midcindia.org व मे.महापरिक्षा या संस्थेच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

**९) लेखी परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या अग्निशमन विमोचक, ऑटो इलेक्ट्रीशियन व मदतनीस (अग्निशमन) या पदांकरीता १) शारीरीक पात्रता २) शारीरीक क्षमता/मैदानी चाचणी ३) मुलाखत ही नियोजित पद्धतीने घेण्यात येईल.**

**१०) लेखी परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या चालक यंत्र चालक व चालक (अग्निशमन) या पदांकरीता १) शारीरीक पात्रता २) शारीरीक क्षमता/मैदानी चाचणी ३) व्यवसायीक चाचणी ४) मुलाखत ही नियोजित पद्धतीने घेण्यात येईल.**

शारीरीक क्षमता/पात्रता चाचणी :-

१. १५ फुट दोर चढणे :- १५ गुण.

| अंतर | गुण |
|---|---|
| पूर्ण | १५ |
| ३/४ | १२ |
| १/२ | ०८ |
| १/४ | ०४ |

२. १०० मीटर्स अंतर ५० किलोग्रॅम मानवी प्रतिकृती खांद्यावर घेवून धावणे :- १५ गुण.

| वेळ (सेकंद) | गुण |
|---|---|
| २० किंवा कमी | १५ |
| २१ | १४ |
| २२ | १३ |
| २३ | १२ |
| २४ | ११ |
| २५ | १० |
| २६ | ०९ |
| २७ | ०८ |

स्वा. वाटी

| | |
|---|---|
| २८ | ०७ |
| २९ | ०६ |
| ३० | ०५ |
| ३१ पेक्षा अधिक | ०० |

३. शिडी चढणे/उतरणे :- १५ गुण.

| वेळ (सेकंद) | गुण |
|---|---|
| २० किंवा कमी | १५ |
| २१ | १४ |
| २२ | १३ |
| २३ | १२ |
| २४ | ११ |
| २५ | १० |
| २६ | ०९ |
| २७ | ०८ |
| २८ | ०७ |
| २९ | ०६ |
| ३० | ०५ |
| ३१ पेक्षा अधिक | ०० |

४. उंची - (अधिक असल्यास) :- *०५ गुण.

| से.मी | गुण |
|---|---|
| १६५-१६७.९ | ०० |
| १६८-१७०.९ | ०१ |
| १७१-१७३.९ | ०२ |
| १७४-१७६.९ | ०३ |
| १७७-१७९.९ | ०४ |
| १८० पेक्षा जास्त | ०५ |

५. व्यावसायिक चाचणी :- चालक यंत्र चालक व चालक (अग्निशमन) या दोन पदांकरीता प्रत्यक्ष वाहन चालविणे व वाहनासंबंधी आवश्यक असणारी माहिती याबाबतची व्यवसायिक चाचणी परीक्षा "प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत" घेण्यात येईल.

११) शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल.

१२) एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की, अर्जदार पुढे या बटणावर क्लिक करावे लागेल. त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१३) आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल.
उमेदवार एकाच अर्जामध्ये पात्र असलेल्या (जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता, वयाची अर्हता, आणि अन्य अर्हता विचारात घेऊन) सर्व पदांना (इच्छुक असल्यास) अर्ज करु शकतो, त्यामुळे पदानुसार वेगळा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

| Sr.No. | Post Name in English | Post Name in Marathi. |
|---|---|---|
| १ | Driver Operator | चालक यंत्र चालक |
| २ | Driver (Fire) | चालक (अग्निशमन) |
| ३ | Fireman Rescurer | अग्निशमन विमोचक |
| ४ | Auto Electrician | ऑटो इलेक्ट्रीशियन |
| ५ | Helper (Fire) | मदतनीस (अग्निशमन) |

१४) त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे.

१५) उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरीता तीन प्रधान्यक्रम निवडू शकतो, तीनही पसंतीक्रमात उमदेवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलपब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमूण देण्यात येईल.

१६) उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पध्दतीने (इंटरनेट बँकिंग, क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड, भीम UPI) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.

१७) ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारेखस मध्यरात्री १२.०० वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

१८) जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराव्दारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८००३०००७७६६ वर कॉल करा.

१९) नोंदणी मधील तपशील जसे की, वापरकर्ता नाव (USERNAME) ई-मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), निवडलेले पद, पसंतीचे स्थान १/२/३, जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी, शैक्षणिक पात्रतेचा तपशील इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन :-**

१) युजरनेम आणि पासवर्ड लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

२) अर्ज प्रिंट करण्यासाठी **प्रिंट प्रिव्हयू** या पर्यायावर क्लिक करा.

सही/- वारीगे

नोंद :- उमेदवाराने आपला PDF स्वरुपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र व संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वतः जवळ ठेवावा.

## नियुक्तीच्या अटी व शर्ती :-

१) **सदर जाहिरात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचारी (वर्गीकरण, सेवाभरती व पदोन्नती) विनियम २०१३ मधील नियम ६.४ नुसार फक्त पात्र पुरुष उमेदवारांसाठीच मर्यादित आहे.**

२) अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जातील. ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे अर्ज www.midcindia.org व www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १५/१०/२०१९ ते दि.०४/११/२०१९ पर्यंत उपलब्ध असतील.

३) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करणारा न आढळल्यास उमेदवारी रद्दबातल केली जाईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

४) **अतिंम निवडीपुर्वी जिल्हाशल्य चिकित्सक, शासकीय रुग्णालय यांचेमार्फत वैद्यकिय चाचणी करुन घेणे व त्यांचेकडून प्राप्त झालेला अग्निशमन सेवेत काम करण्यास सक्षम असल्याबाबतचा दाखला अग्निशमन विभागात सादर करणे बंधनकारक आहे.**

५) फक्त याच जाहिरातीला अनुसरुन प्राप्त झालेल्या उमेदवाराचे अर्ज विचारात घेतले जातील. महामंडळाकडे यापुर्वी आलेल्या अर्जाचा स्विकार केला जाणार नाही.

६) मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा शासन निर्णयानुसार ०५ वर्ष शिथिलक्षम राहील.

७) महामंडळाच्या अग्निशमन सेवेत तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण यांच्या अग्निशमन सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांनी महामंडळाकडे अर्ज सादर करतांना योग्य त्या साखळीमार्फत कार्यरत विभागाचा ना-हरकत दाखल्यासह अर्ज करणे क्रमप्राप्त आहे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध न्यायप्रविष्ट प्रकरणे, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरणे, विभागीय चौकशी वा तत्सम इत्यादी कारवाई सुरु असेल अशा उमेदवारांनी संबंधित माहिती अर्ज भरतेवेळी महामंडळास देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराच्या सेवा कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार महामंडळाकडे असतील. तसेच अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांकरीता अनुभवाच्या आधारे वयाची अट शिथील करण्याचे अधिकार म.औ.वि.महामंडळाने राखुन ठेवले आहेत.

८) जे उमेदवार उपरोक्त नामनिर्देशित केलेल्या विविध पदांसाठी विहित केलेल्या शैक्षणिक अथवा तांत्रिक परिक्षेसाठी/पाठ्यक्रमासाठी बसले असतील त्यांनी अर्ज करावेत. परंतु सदर अर्हता सेवा भरतीची अंतिम प्रक्रिया पुर्ण करेपर्यंत सादर न केल्यास त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

९) विविध पदांसाठी विहित केलेली अनुभवाची व वयाची अर्हता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास नमुद केलेली अनुभवाची व वयाची अट शिथिल करण्याबाबत विचार करण्यात येईल व त्याबाबतचे सर्व अधिकार म.औ.वि.महामंडळाने राखुन ठेवले आहेत.

१०) उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.

---- K/-

११) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय कारणांसाठी सुध्दा किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमदेवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

१२) उमेदवार जे वेगवेगळे विभाग / वेगवेगळया पदांसाठी अर्ज करत असतील, अशा उमेदवारांनी सर्व विभाग / पदे यांकरिता सारखी परीक्षा शहरांची निवड करावी. अन्यथा वेगवेगळया पदांसाठीच्या परीक्षेसाठी वेगवेगळे परीक्षा केंद्र / शहर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१३) उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रम उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल व ते बंधनकारक असेल.

१४) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमदेवाराने एकाच पदाकरीता एकापेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.

१५) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.

१६) पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये. तसेच यापुर्वी महामंडळाकडे नोकरीकरीता केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१७) उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा / अपुर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरतीप्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना म.औ.वि.महामंडळ जबाबदार राहणार नाही. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची, पासवर्डची माहिती कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तीसोबत देवाण-घेवाण करुन नये. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा ईमेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

१८) ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र व परीक्षा स्थळ महा परीक्षा यांच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी आठ दिवस आधी अर्ज क्रमांकानुसार उपलब्ध करुन देण्यात येईल.

ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास पत्राव्दारे पाठविण्यात येणार नाही. उमेदवारांना परिक्षेची माहिती महा परीक्षा यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

१९) परीक्षेचे केंद्र / स्थळ/ दिनांक वेळ/ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

२०) म.औ.वि.महामंडळ कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परीक्षा केंद्र वाढवणे/कमी करणे याचे अधिकार राखून ठेवत आहे.

२१) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक प्रमाणपत्रे,अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाव्दारे स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

....15/-

२२) सदरहू परीक्षेकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना किमान ५० टक्के गुण व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना ४५ टक्के गुण प्राप्त करणे बंधनकारक राहील. त्यापेक्षा कमी गुण प्राप्त केल्यास सदर उमेदवारांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

२३) वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्गीय प्रवर्ग, नॉन क्रिमिलेअर, माजी सैनिक, खेळाडू, अंशकालीन उमेदवार संदर्भात न चुकता स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबंधीत दाव्याचा विचार केला जाणार नाही.

२४) सदरहू भरती प्रक्रियेत जो उमेदवार तोतयेगिरी करणे किंवा बनावट कागदपत्रे सादर करणे किंवा कागदपत्रांमध्ये अनधिकृत फेरफार करणे किंवा चूकीची किंवा खोटी माहिती भरणे किंवा महत्त्वाची माहिती दडवून ठेवणे ई. बाबी आढळून आल्यास त्याच्या विरुध्दच्या फौजदारी कार्यवाहीस पात्र असेल.

२५) ऑनलाईन परीक्षेनंतर पात्र उमेदवारांनी मुळ कागदपत्रे छाननी / तपासणीसाठी सादर करणे आवश्यक राहील. त्याकरीता तारीख व वेळ महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२६) ऑनलाईन परीक्षेतील गुणानुक्रम व आरक्षण विचारात घेऊन पात्र झालेल्या उमदेवारांची नावे महामंडळाच्या www.midcindia.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

२७) ऑनलाईन परीक्षा ही उमेदवारांच्या कोणतीही कागदपत्रांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर त्याची वैधता व उमेदवाराच्या गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल. अर्जातील दाव्यानुसार मुळ कागदपत्रे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून पडताळणी / तपासणीच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच उमेदवारांने प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेल्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. जात वैधता प्रमाणपत्र वगळून इतर सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे ही ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किंवा त्यापुर्वीचे प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.

२८) खेळाडू या समांतर आरक्षणाअंतर्गत अर्ज सादर करतेवेळी उमेदवारांने शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा शासन निर्णय क्र. राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.०१/०७/२०१६ अन्वये अर्ज करण्यापूर्वीच सुधारित तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने मूळ प्रमाणपत्र छाननीच्यावेळी विभागीय उपसंचालक यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

२९) एकदा ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील स्वत: जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

३०) ऑनलाईन परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी माहिती महा परीक्षा या संस्थेच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

३१) **उमेदवारांने अर्ज करण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी.** भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमदेवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराचे चुकीची माहिती

दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

३२) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

३३) परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

३४) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे की,

a. मूळ आधार कार्ड (Original AADHAR CARD),
b. मूळ पॅनकार्ड (Original PAN CARD),
c. मूळ पासपोर्ट (Original PASSPORT),
d. मूळ मतदार ओळखपत्र (Original VOTER ID),
e. मूळ फोटोसह राष्ट्रीयकृत बँकेचे अद्ययावत पासबुक (Original Nationalised bank updated PASSBOOK with photo attached),
f. इतर अग्निशमन सेवेत कार्यरत असल्याचे ओळखपत्र. (Original ID Card issued by Other Fire Services)

उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही. तसेच रेशन कार्ड व ई-आधार कार्ड परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्विकारले जाणार नाही.

३५) अर्जासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील छोटया कुटूंबाचे व अर्जातील माहिती खरी असल्याचे प्रतिज्ञापन कागदपत्र / प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहील.

३६) मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १२/१२/२०११ नुसार आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधित उमेदवाराची जबाबदारी राहील. अन्यथा: सदर उमेदवाराची या महामंडळातील सेवा समाप्त करण्यात येईल.

३७) तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत, या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य असले. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. तथापि, सदर विधीग्राह्य कालावधीमध्ये बदल करण्याचे अधिकार महामंडळाने राहतील.

३८) ऑनलाईन परीक्षाअंती गुणानुक्रमे शारिरीक क्षमता/मैदानी चाचणी व मुलाखतीस पात्र झालेल्या उमदेवारांना त्यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जानुसार सर्व मुळ कागदपत्रे (प्रमाणपत्र/दाखले) व साक्षांकित प्रती (Attested Copies) या केंद्र / राज्यशासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्टर, मुख्याध्यापक यांच्याकडून किंवा स्वतः साक्षांकित केलेल्या प्रती अंतिम निवडपूर्व तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

- शैक्षणिक / व्यावसायीक / तांत्रिक अर्हता प्राप्त केलेली प्रमाणपत्रे / गुणपत्रिका.
- जातीचा दाखला / जात वैधता प्रमाणपत्र.
- वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्माचा दाखला.
- अनुभवाचे प्रमाणपत्र.
- विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र.

- प्रकल्पग्रस्त असल्यास उमेदवाराचे नावे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र.
- लाहान कुटूंब असल्याचे व अर्जात भरलेली माहिती खरी असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन.
- अधिवास प्रमाणपत्र. (महाराष्ट्र राज्या बाहेरील उमदेवारांकरीता)
- याशिवाय उमेदवाराला जे-जे लागू होते त्या-त्या दाखल्यांच्या प्रती इ.

३९) जाहिरातीत दिलेली पद संख्या कमी-जास्त / बदल होण्याची शक्यता आहे. निवड झालेल्या उमेदवारांना महामंडळाच्या राज्यातील कोणत्याही कार्यालयात नेमणूका देण्यात येतील.

४०) निवड झालेल्या उमेदवारांना महामंडळाचे सेवा विनियम २०१३ व २०१८ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा विनियम,१९७९ बंधनकारक राहतील. महामंडळाच्या सेवा विनियमात नमूद केलेल्या पदांना आवश्यक असणाऱ्या परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे उमदेवारास बंधनकारक असेल व सदर पदांच्या परीक्षेकरीता महामंडळाच्या सेवा विनियमात नमूद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

४१) निवड झालेल्या उमेदवाराने रुजू होते वेळी परिविक्षाधिन पदावर नियुक्ती केल्यापासून पाच वर्षापर्यंत महामंडळाच्या सेवेचा राजीनामा देणार नाही किंवा नोकरी सोडून जाणार नाही, तसेच पाच वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नोकरी सोडल्यास, सहा महिन्याच्या पूर्ण वेतना (Gross Payment) एवढी रक्कम म.औ.वि. महामंडळास देण्यास बाध्य राहीन असे बंधपत्र सादर करावे. सेवेत ५ वर्षे पुर्ण झालेनंतर त्यांना महामंडळाची सेवा सोडावयाची असल्यास, एक महिन्याची पूर्व सूचना देणे व प्रशासनाची पूर्व मंजूरी घेणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

४२) सदर जाहिरातीत काही संभ्रम असल्यास या महामंडळाच्या www.midcindia.org या संकेतस्थळावरील जाहिरात ही अधिकृत समजण्यात येईल.

४३) सदर भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर पूर्णतः वा अशंतः रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

४४) सदर बाबतीत प्राप्त होणारे न्यायालयीन खटले/दावे हे फक्त मुंबई न्यायाधिकार क्षेत्रातीलच असतील.

***टिप :- महामंडळाच्या ठाणे-बेलापुर औद्योगिक क्षेत्रातील "ठाणे बेलापुर इंडस्ट्रीज असोसिएशन" मार्फत दैनंदिन देखभालीसाठी चालविण्यात येणाऱ्या फायर ॲन्ड इर्मजन्सी रिसपॉन्स स्टेशन, अग्निशमन केंद्रातील जे शैक्षणिक अर्हता धारण करतात असे कर्मचारी सदर जाहिरातीला अनुसरुन अर्ज करण्यास पात्र असतील. सदर कर्मचाऱ्यांच्या वयाची अट शिथील करण्याबाबतचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखुन ठेवले आहेत.**

**मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार**
**म.औ.वि.महामंडळ,मुंबई-९३.**

## उमेदवारांने करावयाचे प्रतिज्ञापत्र

१) मला एक पेक्षा अधिक पती / पत्नी / नाही किंवा माझे अद्याप लग्न झालेले नाही. (नको असेल ते खोडावे)

२) माझेवर कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावलेली नाही किंवा शिस्तभंगाची कारवाई झाली नाही किंवा चालू नाही.

३) मला स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा कोणत्याही सरकारच्या सेवेतुन बडतर्फ / काढून टाकण्यात आले नाही. (कोणत्याही स्थानिक प्राधिकरणात आतापर्यंत सेवेत नसल्यास तसे नमूद करावे...............................)

मी-------------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खरी व सत्य आहे. त्या पृष्ठयर्थ मी, प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास, माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल. तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस किंवा नियुक्ती रद्द होईल याची मला पूर्ण जाणीव आहे. त्यासंबंधी महामंडळाची निवड समितीचा अथवा नियुक्ती प्राधिकरण यांचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील. त्याबद्दल मी नोकरी गमावण्यास बंधनकारक राहील व त्यासंबधी माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

आपला विश्वासू,

(अर्जदाराची स्वाक्षरी)

टिप :-

- वर नमुद केलेल्या लागू असणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. नको असेल ते खोडावे.
- अर्जातील सर्व तपशिल अचुक लिहिणे आवश्यक आहे. अर्ज अपुर्ण लिहिल्यामुळे आपला अर्ज अपात्र ठरवल्यास, त्याची जबाबदारी हे कार्यालय स्विकारणार नाही. आवश्यक कागदपत्रांव्यतिरिक्त अन्य कोणतेही कागदपत्र जोडू नयेत.

---------------------------------------*********************----------------------------

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापन) नियम २००५ च्या अधिसूचनेनुसार**

## प्रतिज्ञापन

नमुना-अ
(नियम ४ पहा)

मी, श्री / श्रीमती / कुमारी.---------------------------------------------------- श्री.---------
---------------------------------------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/ पत्नी, वय------------ वर्षे,
राहणार----------------------------------------------------------------------------------------------------
------- याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१) मी------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला -------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------- आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमुद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी
(अर्जदारांचे नाव)